

रामण विज्ञान केंद्रात आयोजित उत्सवात सादर करण्यात आलेले प्रकल्प.

# अन्नसुरक्षेवर हवेत प्रयोग

## प्रशांत अग्रवाल यांचे आवाहन; रामणमध्ये उत्सव

म. टा. प्रतिनिधी, नागपूर

'जगाची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढते आहे. या भरमसाठ लोकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि या लोकसंख्येला पुरेल इतके अन्न असावे, यासाठी अन्नसुरक्षेच्या दृष्टिकोनातून विचार होणे आवश्यक आहे. जगात सुरू असलेल्या संशोधनांमध्ये भाज्यांपासून मांसाचे उत्पादन केले जात आहे. आपणसुद्धा विज्ञानात नावीन्यपूर्ण प्रयोग करायला हवेत. तरुणांनी नोकरी शोधण्यापेक्षा नोकरी देणारे व्हावे', असे आवाहन पुणे येथील ग्रीन व्हेन्शन टेक्नॉलॉजीचे डॉ. प्रशांत अग्रवाल यांनी विद्यार्थ्यांना केले.

रामण विज्ञान केंद्रात रामण फेस्टिव्हल ऑफ इनोव्हेशन या वार्षिक उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. १३ ते १५ फेब्रुवारीदरम्यान आयोजित या उत्सवाच्या उद्घाटनाप्रसंगी अग्रवाल बोलत होते. यावेळी प्रियदर्शिनी कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगचे प्राचार्य डॉ. विवेक नानोटी, रामणचे प्रकल्प समन्वयक विजय शंकर शर्मा मंचावर उपस्थित होते. शहरातील विविध शाळा, कॉलेजेसमधील दोनशेहून अधिक विद्यार्थ्यांनी या उत्सवात सहभाग घेतला आहे. या विद्यार्थ्यांनी पूर्ण केलेले विविध नावीन्यपूर्ण प्रकल्पाचे मॉडेल्स येथे ठेवण्यात आले आहेत. हे मॉडेल्स स्टार्टअप प्रकल्पांसाठी वापरले जाऊ शकतात.

यावेळी नानोटी म्हणाले, 'विद्यार्थ्यांनी नेहमीच शिकण्याची वृत्ती जागृत ठेवावी. आपण समाजाचे ऋण कोणत्या पद्धतीने फेडू शकतो, याचा विचार करायला हवा.' विद्यार्थ्यांनी आपल्या संकल्पना नॅशनल इनोव्हेशन फाउंडेशनच्या संकेतस्थलावर अपलोड कराव्यात, अशी सूचनाही त्यांनी यावेळी दिली. हा उत्सव १३ ते १५ फेब्रुवारीदरम्यान सकाळी ११ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत दर्शकांसाठी खुला असेल.